सन २०१७-१८, जलयुक्त शिवार
अभियान लेखाशिर्ष ४४०२ २६८१,
निधी वितरीत करणेबाबत.

# महाराष्ट्र शासन

## जलसंधारण विभाग

**शासन निर्णय क्रमांकः जशिअ- २०१७/प्र.क्र. १९८/जल-७**

हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : १२ जुलै, २०१७

वाचा :-

**१. शासन निर्णय, जलसंधारण विभाग, क्रमांक: जशिअ-२०१४/प्र.क्र. २०३/जल-७, दिनांक ५ डिसेंबर, २०१४**
**२. शासन निर्णय, जलसंधारण विभाग, क्रमांक: जशिअ २०१६/प्र.क्र. २६६/ जल-७, दि. ३० डिसेंबर, २०१६**
**३. शासन निर्णय, जलसंधारण विभाग, क्रमांक: जशिअ-२०१६/प्र.क्र.५१८/जल-७, दिनांक १३ ऑक्टोबर, २०१६ व दिनांक १४ मार्च , २०१७**
**४. शासन निर्णय, जलसंधारण विभाग, क्रमांक: जशिअ-२०१७/प्र.क्र.१९८/जल-७, दिनांक २७ एप्रिल, २०१७, दिनांक २२ मे २०१७ व दिनांक ७ जून २०१७**
**५. शासन परिपत्रक, वित्त विभाग क्रमांक: अर्थसं-२०१७/ प्र.क्र.९४/ अर्थ-३, दिनांक ३० जुन, २०१७**

**प्रस्तावना: -**

राज्यात वारंवार उद्भवणा-या टंचाई परिस्थितीवर मात करण्यासाठी कायमस्वरुपी उपाययोजना म्हणून जलयुक्त शिवार अभियान दि. ५ डिसेंबर, २०१४ च्या शासन निर्णयान्वये राबविण्यात येत आहे. या अभियानातर्गत सन २०१५-१६ मध्ये ६२०२ व सन २०१६-१७ मध्ये ५२९२ असे एकूण ११४९४ गावे निवडून कामे सुरु करण्यात आलेली आहेत. तसेच सन २०१७-१८ मध्ये ५००० गावे निवडून आराखडा तयार करून कामे सुरु करण्यात आलेली आहेत.

जलयुक्त शिवार योजनेसाठी ४४०२ २६८१ हे नवीन स्वतंत्र लेखाशिर्ष उघडण्यात आले असून सन २०१७-१८ करिता रु.१२००.०० कोटी निधी अर्थसंकल्पीत करण्यात आला आहे. सदर निधीपैकी सन २०१६-१७ च्या गावांकरिता संदर्भाधीन शासन निर्णय दिनांक २७ एप्रिल २०१७ अन्वये रु.२००.०० कोटी निधी व दिनांक २२ मे, २०१७ अन्वये ₹ ५००.०० कोटी निधी आणि सन २०१७-१८ च्या गावाकरिता दिनांक ७ जून, २०१७ अन्वये ₹ ४७५.०० कोटी निधी वितरीत करण्यात आलेला आहे.

सन २०१७-१८ मधील अर्थसंकल्पित झालेल्या निधीपैकी ०.२५ टक्के निधी जलयुक्त शिवार अभियानाचे संनियत्रण करण्यासाठी मंत्रालय स्तरावर स्थापन केलेल्या प्रकल्प व्यवस्थापन कक्षाचे कामकाज चालविण्यासाठी उपलब्ध करून देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**<u>शासन निर्णय</u>:-**

जलयुक्त शिवार अभियानांतर्गत सन २०१७-१८ करिता रु.१२००.०० कोटी (रु. बाराशे कोटी) निधी अर्थसंकल्पीत करण्यात आला आहे. सदर निधीपैकी सन २०१६-१७ च्या गावांकरिता लेखानुदानाव्दारे प्राप्त रु.२००.०० कोटी निधी दिनांक २७ एप्रिल, २०१७, ₹५००.०० कोटी निधी दिनांक २२ मे २०१७ , व सन २०१७-१८ च्या गावाकरिता₹ ४७५.०० कोटी निधी दिनांक ७ जून २०१७ च्या शासन निर्णयान्वये वितरीत करण्यात मान्यता दिलेली आहे.

२. सन २०१७-१८ मधील अर्थसंकल्पित झालेल्या ₹१२००.०० कोटी निधीपैकी ०.२५ टक्के म्हणजे ₹ ३.०० कोटी (रुपये तीन कोटी) निधी जलयुक्त शिवार अभियानाचे संनियत्रण करण्यासाठी मंत्रालय स्तरावर स्थापन केलेल्या प्रकल्प व्यवस्थापन कक्षाचे कामकाज चालविण्यासाठी वापरण्यास परवानगी देण्यात येत आहे.

३. सदर निधी मागणी क्रमांक एल ७, ४४०२ मृद व जलसंधारण यावरील भांडवली खर्च, ०० १०२ मृद संधारण, ०३ जलयुक्त शिवार अभियान, (०३) (०१) जलयुक्त शिवार अभियान (४४०२ २६८१), ५३ मोठी बांधकामे या लेखाशिर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा.

४. सदर निधी संचालक मृद संधारण व पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन पुणे यांना वितरीत करण्यात येत आहे. कोषागारातून आहरण व संवितरणाकरिता करिता सहायक संचालक लेखा, कृषि आयुक्तालय, पुणे यांना आहरण व सवितंरण अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत आहे.

५. या शासन निर्णयान्वये वितरीत करण्यात येत असलेला ₹३.०० कोटी (रुपये तीन कोटी) निधी जलयुक्त शिवार अभियान, प्रकल्प व्यवस्थापन कक्ष, मंत्रालय येथे वर्ग करावा.

६. सदर शासन निर्णय, वित्त विभागाच्या संदर्भाधिन परिपत्रक क्र.अर्थसं-२०१७ /प्र. क्र. ९४ /अर्थ- ३ दिनांक ३० जून, २०१७ अन्वये विभागास प्राप्त झालेल्या अधिकारान्वये निर्गमित करण्यात येत आहे.

७. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१७०७१२१२५१२१६८२६ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Narayan Karad

Digitally signed by Narayan Karad
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=RD and WCD Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=fc35aa8ffade5bb6105200693c60a32b755f7e67f72965b8dd57adaa570981f1, cn=Narayan Karad
Date: 2017.07.13 12:08:37 +05'30'

**( ना. श्री.कराड )**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१. मा. राज्यपाल यांचे सचिव
२. मा.सभापती विधान परिषद यांचे सचिव
३. मा.अध्यक्ष विधान सभा यांचे सचिव
४. मा.मुख्यमंत्री यांचे सचिव
५. मा.मंत्री (जलसंधारण) यांचे खाजगी सचिव
६. मा.राज्यमंत्री (जलसंधारण) यांचे खाजगी सचिव
७. सर्व मा.मंत्री व मा.राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव
८. मा. विरोधी पक्ष नेता विधानपरिषद व विधानसभा, विधान भवन, मुंबई
९. सर्व मा.विधान परिषद / विधान सभा सदस्य, विधान भवन, मुंबई
१०.मा.मुख्य सचिव यांचे उप सचिव
११.सर्व अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव मंत्रालय
१२.प्रधान मुख्य वनसंरक्षक व महासंचालक, सामाजिक वनीकरण, महाराष्ट्र राज्य, पुणे
१३.आयुक्त (कृषि) महाराष्ट्र राज्य, कृषि आयुक्तालय, पुणे
१४.सर्व विभागीय आयुक्त
१५.संचालक, मृदसंधारण व पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन, कृषि आयुक्तालय, पुणे
१६.मुख्य अभियंता, लघु सिंचन (जलसंधारण),महाराष्ट्र राज्य, पुणे
१७.मुख्य अभियंता, वि.स.सिं. वि. का. नागपूर
१८. संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, पुणे
१९.सर्व अधिक्षक अभियंता, लघु सिंचन (जलसंधारण) मंडळ
२०.सर्व विभागीय कृषि सहसंचालक
२१.संचालक, अर्थ व सांख्यिकी संचालनालय, मुंबई
२२.महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मुंबई (प्रसिध्दीकरीता)
२३.सर्व सहसंचालक, सामाजिक वनीकरण
२४.सर्व मुख्य वनसंरक्षक / सर्व उप वनसंरक्षक
२५.संचालक, महाराष्ट्र सुदूर संवेदन केंद्र, नागपूर

२६.सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद
२७.सर्व जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी
२८. सर्व कार्यकारी अभियंता लघुसिंचन (जलसंधारण)/जिल्हापरिषद
२९.सर्व जिल्हा कोषागार अधिकारी
३०.महालेखापाल (लेखा परीक्षा) महाराष्ट्र राज्य १ व २, मुंबई व नागपूर
३१.महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र राज्य १ व २, मुंबई व नागपूर
३२.सर्व मंत्रालयीन विभाग
३३.सर्व सहसचिव /उपसचिव /अवर सचिव /कार्यासन अधिकारी, जलसंधारण विभाग
३४.कार्यासन जल-११ व कार्यासन जल-१९ जलसंधारण विभाग, मंत्रालय
३५.निवड नस्ती जल-७.